An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

ISSN 2277 - 5730
Volume - VIII, Issue - I, January - March - 2019

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refered
and UGC Listed Journal

# AJANTA

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

ISO
9001:2008
QMS
ISBN / ISSN

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. अलका अनिल मानकर

As a Recognition of the Publication of the Paper Titled


जागतिक मंदी भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम व उपाय

Ajanta Prakashan
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA

अ





Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV / V



Ajanta Prakashan

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - V



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिक मंदी भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम व उपाय<br>प्रा. डॉ. अलका अनिल मानकर | १-५ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. जागतिक मंदी भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम व उपाय

**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर**
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा (रेल्वे), जि. बुलडाणा.

१९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत इंग्लीश जगत म्हणजेच युरोपचे जग असे समीकरण बनले होते. युरोप खंडात कोणतीही अस्वस्थता निर्माण झाली नव्हती. परंतु १९ व्या शतकाच्या अखेरीस जगात अनेक प्रतिस्पर्धी राष्ट्रे आपला विकास करण्यास पुढे आल्याने इंग्लंडचे वर्चस्य कमी होत गेले. जागतिक अर्थकारणाचा केंद्रबिंदू इंग्लंडकडून युरोपातील अन्य राष्ट्रांकडे झुकला २० व्या शतकाच्या प्रारंभापासूनच जागतिक व्यापाराचे क्षेत्र अमेरिकेकडे खेचतं गेले व बरेचसे आर्थिक बदल घडून आले १९२० च्या दरम्यान निर्माण झालेले तेजीचक्र अव्याहत टिकेल असा अर्थतज्ञांचा कयास होता परंतु भ्रमनिरासच झाला. प्रो व्हूव्हर म्हणतात की भावी सुवर्ण युग सामोरे येत आहे. तत्पूर्वीची महामंदी ही अल्पकालीन संकट समस्या आहे. १९२९ ते ३३ मध्ये जागतिक महामंदी निर्माण झाली. थोडक्यात औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात खूप मोठे परिवर्तन घडून आले. त्यातूनच सामाजिक, आर्थिक परिवर्तन, तांत्रिक, वैज्ञानिक बदल घडून आले.

दुसऱ्या महांयुद्धानंतरच्या कालखंडात पहिल्यांदाच जागतिक अर्थव्यवस्था संकुचित होतांना दिसते. त्यामुळे जागतिक उत्पादनात घट निर्माण होऊन बेकारीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. ऑगष्ट २००७ मध्ये अमेरिकी अर्थव्यवस्थेत गृहवित्त कर्जाच्या संदर्भात उद्भवलेल्या आर्थिक वादळातून महामंदीचा जन्म झाला अमेरिकेत जी महामंदी आली तिची कारणे पुढील प्रमाणे.

१) अमेरिकेचे परदेशात गुंतलेले भांडवल.
२) उत्पादनातील अवास्तव वाढ
३) ग्राहकांची क्रयशक्ती ओसरणे.
४) उत्पन्नाचे सदोष वाटप
५) अर्थव्यवस्थेतील विषमता.
६) शेतमालाचे भाव कमी होणे.
७) सामान्य जनतेचे वाढते दारिद्र्य
८) शेअर्स खरेदी आणि सट्टेबाजीत वाढ
९) सदोष बँकिंग धोरण इ.

अमेरिकेत निर्माण झालेल्या या आर्थिक मंदीने आपली चाल अधिकच आक्रमक केली. या मंदीमुळे २००९ च्या सुरूवातीला जगभराच्या कंपन्यांनी कर्मचाऱ्यांची कपात करणे सुरू केले.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अंदाजानुसार जवळ-जवळ २० दशलक्ष कामगार बेरोजगार होतील.

जगभरात आलेल्या आर्थिक मंदीची लाट सर्वत्र असल्यामुळे कोणीही त्यास अपवाद नाही. भारतावर सुद्धा तिचे सावट आले आहे.

१) जांगतिकीकरणामुळे व्यवसायाने सर्व देश एकमेकांशी जोडले आहेत. त्यामुळे इतर देशातील मंदी आपल्या देशातील मंदीस कारणीभूत असू शकते.

२) सतत मंदीबद्दल प्रसारित होणाऱ्या बातम्यांचा ग्राहकांच्या मानसिकतेवर प्रभाव होऊन, ग्राहक खर्चाबद्दल दक्ष होतो. त्यामुळे पैशाच्या हस्तांतरणाचा वेग कमी झाला म्हणजे लोकांनी पैसा स्वतःकडे ठेवला, बँकेत जमा केला त्यामुळे देशात होणाऱ्या अर्थव्यवहारांची संख्या कमी होऊन मंदीचे वातावरण तयार झाले.

३) देशातील व्यवसायाची सर्व क्षेत्रे एकमेकांशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निगडित असल्यामुळे एका क्षेत्राचा दुसऱ्यावर परिणाम होतो.

४) व्यवसायात प्रत्येक बषी सातत्याने वाढीची अपेक्षा अनैसर्गिक आहे.

५) काही वर्षी तेजीनंतर मंदी येणे नैसर्गिक आहे.

६) काही क्षेत्रांसाठी अवाजवी पगार, परतफेडीची क्षमता नसतांना दिलेले कर्ज, व्याजदर कमी, जाहिरातींची प्रलोभने, त्यामुळे ग्राहकांनी गरजेपेक्षा प्रतिष्ठेसाठी खरेदी केली त्यांची परतफेड न झाल्यामुळे खरेदी केलेल्या वस्तू कुचकामी निघाल्या आणि विक्री न झाल्यामुळे वित्तसंस्थेस त्याचा फटका बसला असे चक्र सुरू झाल्याने मंदी निर्माण झाली.

थोडक्यात भारतात मंदीचा प्रभाव फक्त औद्योगिक क्षेत्रापुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद गुंतवणूक विश्वावर दिसत आहेत.

आर्थिक मंदी, वाढती बेरोजगारी, मागणीचा अभाव, लोकांच्या जीवनात अस्थिरता जाणवू लागली. गेल्या २-३ वर्षात गुंतवणूक क्षेत्राला वाईट दिवस पहावे लागले. शेअर बाजारातील शेअरचे मूल्य खाली जात होते. गुंतवणूक करतांना कोणत्या क्षेत्रात करावयाची, किती करावयाची, केलेली गुंतवणूक बुडणार तर नाही अशी भिती गुंतवणूकदारांना भेडसावत आहे. गुंतवणूकदाराने सर्वप्रथम त्यांच्या गरजा काय आहेत. याचा विचार करून त्यानंतर उत्पन्न व खर्चाचा आराखडा तयार करावा. त्याला लागणाऱ्या कर्जाचा अंदाज बांधावा व गुंतवणूक करावी.

जागतिक आर्थिक मंदीतील सर्वात मोठे संकट म्हणजे बेकारी वेतन कपात, ब्लॉक क्लोझर, ले ऑफ, रिप्रेचमेंट आणि कामगार कपातीच्या योजना आता सुरू झालेल्या आहेत. जेट या विमान कंपनीने १ मे २००९ ला म्हणजेच कामगार दिनी १९० कर्मचाऱ्यांना घरी बसविले. ज्यांचा पगार ७५०००/- रु. पेक्षा जास्त आहे, त्यांच्या पगारावर २५% कपात करण्याचा निर्णय घेतला.

आजच्या या स्पर्धेच्या युगात निर्माण झालेल्या मंदीमुळे दुकानदार, उद्योजक, शेतकरी, नोकरदार, बिल्डर्स, मजूर, हमाल आणि कारखानदार सर्वजण चिंताग्रस्त झाले आहेत. सर्वत्र चिंतायुक्त व अनिश्चितता दिसून येते. स्पर्धेपुढे टिकाव लागण्यासाठी दिवस रात्र प्रयत्न करावे लागत आहेत. देरे हरी पलंगावरी, हे दिवस आता संपले. थांबला तो संपला, सुजाण व्यावसायिक स्वतःची प्रगती करत आहेत. सर्वांसमोर प्रगतीचा कुशलतेचे, सुधारणेचे आव्हान आ वासून बसले आहे. स्पर्धेचे आव्हान सोपे नसल्याने सर्वांना कंबर कसून कामाला लागावे लागत आहे. जे आतापर्यंत झोपलेले होते ते आता मंदीमुळे खडबडून जागे झाले. प्रत्येक क्षेत्रात नाविन्य, तत्परता असेल तरच ते टिकेल अन्यथा मृत्यू अटळ आहे. प्रत्येक उत्पादन, विक्री माल स्वस्त व दर्जेदार असेल तरच भविष्यकाळ उज्वल आहे. उद्योग, शेतीसाठी पुर्वीपेक्षा आज कर्ज मिळविणे सोपे असले तरी विक्री जोखिमेची असल्याने समस्या निर्माण झाली आहे. मंदीच्या काळात जाहिरातींवर अधिक भर दिल्या जातो. वस्तू जरी कमी किमंतीत मिळत असल्या तरी लोकांना रोजगार नसल्याने त्यांची मागणी कमी आहे. भविष्यकाळ अधिक अनिश्चित असल्यांने खर्चावर नियंत्रण ठेवून उपभोक्ता बचतीकडे वळला आहे. त्यामुळे खर्चकपातीमुळे पुन्हा मंदी असे व्यापारचक्र निर्माण होते.

कार्यात कुठलीही दिरंगाई आज चालत नाही. प्रत्येकाला नवप्रवर्तनवादी दृष्टिकोण बाळगावा लागणार आहे. अर्थव्यवस्थेत मंदी निर्माण होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे प्रभावी मागणीची कमतरता अर्थशास्त्राच्या सिद्धांतानुसार कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त समाधान मिळविण्याचा मनुष्य सतत प्रयत्न करतो. उपभोक्ता कोणतीही वस्तू घेतांना ती टिकावू आहे का याची खात्री करून घेतो. तो दिखाऊपणाचा विचार करत नाही. साधी राहणी उच्च विचारसरणी, उधळपट्टी वा नासाडी करू नये याची शिकवण लहानपणापासूनच दिली गेलेली असते. याचा परिणाम मागणीत घट झाल्याने मंदी वाढते.

भारतात या मंदीचा परिणाम आयात निर्यातीवर मोठ्या प्रमाणावर दिसतो. भारतीय उद्योग वर्तुळात लोखंड, पोलाद उद्योगापासून त्याची झळ सिमेंट उद्योग, इलेक्ट्रॉनिक उद्योगांपर्यंत पोहचली आहे. या उद्योगांतूनही कामगार, कर्मचारी कपात सुरू झाली आहे. मंदीचा भारतातील लहान मोठ्या सर्वच उद्योगांवर परिणाम झालेला आहे. मंदीचे उत्पादक, व्यावसायिक यावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष परिणाम होतात.

१) मंदीमुळे व्यवसायातील नफ्याचे प्रमाण कमी होते.

२) मंदी अधिक काळ राहिल्यास तिची तीव्रता वाढल्यास तोटा होतो.

३) ग्राहकांकडून पैसे वेळेवर न मिळाल्याने कंपनीची आर्थिक घडी विस्कळीत होते.

थोडक्यात मंदीचा कळत न कळत परिणाम देशाच्या विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण होतो म्हणून त्यावर योग्य ते उपाययोजना अवलंबिण्याची गरज आहे.

मंदीच्या छायेत सापडलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी केंद्र सरकाने अलीकडेच काही सवलती जाहीर केल्या.

१) केंद्रीय मूल्यवर्धित करात (सॅनव्हॅट) सरसकट ४% कपात करण्याचे ठरविले.

२) वाहन, सिमेंट, पेट्रोलियम पदार्थ स्वस्त केले.

३) रिझव्ह बँकेच्या रेपो आणि रिव्हर्स रेपे दरात ११% कपात केली.

४) सेवाकर आणि उत्पादनशुल्कात कपात केली.

तसेच सरकारने देशात प्रभावी नियंत्रकाची भूमिका पार पाडायला हवी सरकारने उद्योग व्यवसाय चालवू नयेत पण खाजगी क्षेत्राला वाव देणे आजची गरज आहे. मंदीची मरगळ दूर करण्यासाठी काळ्या पैशाचे पांढऱ्या पैशात रूपांतर करण्यासाठी प्रथम काळा पैसा बाहेर काढला पाहिजे. आज आमिष त्यांना काळा पैसा बाहेर काढण्यासाठी दाखविले जाते. पण उद्या हेच सरकार कायम वेळ आणील याची भिती ह्या लोकांना वाटते. काळा पैसा जाहीर करणाऱ्यांना शासनाने मानपत्र द्यावे. हा प्रचंड पैसा चलन वलनात आल्यावर त्याचा वापर कशासाठी करावयाचा हे सर्व प्रथम ठरवावे. या पैशाचा वापर परकीय कर्जाची परतफेड करण्यासाठी केल्यावर त्याचा चांगला परिणाम होईल. सरकारने देशात लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. लघु उद्योजकांनी प्रत्येक बाबींसाठी सरकारवर विसंबून न राहता स्पर्धात्मक व दर्जेदार उत्पन्नावर भर दयावा. नवप्रवर्तकाला देखील मंदीच्या काळात सरकारकडून विशेष सवलती देण्यात याव्या की जेणे करून अर्थव्यवस्थेत आशावादी वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

थोडक्यात मंदीवर उपाय म्हणून प्रत्येकाने आपल्याकडील ज्ञान, कौशल्य, क्षमता, अनुभव, वेळ, साधनसामुग्री सुविधा, प्रतिमा यांचा पुरेपुर वापर करावा. भविष्याचा वेध घेऊन आवश्यक ते नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. कंपनीच्या कार्यात सुसूत्रता येण्यासाठी पद्धत, प्रणाली, सुसंवाद प्रस्थापित करावा मागणीनुसार उत्पादन करावे.

संदर्भ ग्रंथ

१) संपदा - ऑगष्ट २००९

२) उद्योजक न आक्टोबर २००९

३) कृषकोन्ती - २००९

४) जगाचे आर्थिक सर्वेक्षण, प्रा. सु. के. कुळकणी

५) कृषि अर्थशास्त्र, डॉ. लिला पाटील.

गोषवारा

जगाचे आर्थिकदृष्ट्या विकसित व विकसनशील असे दोन भाग पडतात. भारत विकसनशील तर अमेरिका, युरोप जपान इ. चा विकसित देशात समावेश केला जातो. गेल्या दशकात विकसित देशात आर्थिक अस्थिरता आहे. अमेरिकेचा आर्थिक वाढीचा वेग स्थिर आहे. पण जर्मनी, फ्रान्स इ. देशात प्रगतीचा वेग जास्त असूनही बेकारीचे प्रमाण वाढलेले आहे. जपानचा आर्थिक वाढीचा बेग घटला आहे. अमेरिका, जपान या देशाच्या तुलनेत फ्रान्स ब जर्मनीत बेकारी दुप्पट पटीने वाढली. विकसित देशात आंतरराष्ट्रीय व्यापारात तूट निर्माण झाली. थोडक्यात संपूर्ण जग मंदीच्या विळख्यात होरपळून निघत आहे.

आहे. भारताच्या संदर्भात विचार केल्यास मंदीचा प्रभाव फक्त औद्योगिक क्षेत्रापुरता मर्यादित नसून त्याचा परिणाम गुंतवणूक, विश्वावर, बेकारीचे वाढते प्रमाण, आर्थिक मंदी, मागणीचा अभाव, शेअर बजार, शेती, उद्योग इत्यादीवर झालेले दिसून येतात. जागतिक मंदीमुळे सर्वच चिंताग्रस्त भितीयुक्त वातावरण निर्माण झाले. लोकांना भविष्यकाळ अंधःकारमय वाटू लागला.

या मंदीतून जर जगाला बाहेर यायचे असेल तर त्यासाठी सर्वप्रथम देशातील काळा पैसा चलनात आणला पाहिजे, भ्रष्टाचार नष्ट केला पाहिजे. प्रत्येकाने मग तो व्यापारी असो वा शेतकरी त्याने परंपरागत दृष्टिकोन सोडून अद्ययावत तंत्राचा वापर करून उत्पादन गुणात्मक दृष्ट्या वाढविणे काळाची गरज आहे. प्रत्येकाने प्रगतीचा विचार करावा. आजच्या मंदीच्या काळात स्पर्धेत उतरण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे अत्यंत आवश्यक आहे. आजचा हा काळ म्हणजे डोळसपणाने जगण्याचा काळ आहे. जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला, या उक्तीचा विचार करून प्रत्येकाने स्वावलंबी पणाने जीवन कसे जगता येईल याचा विचार करावा.